शासकीय तंत्रनिकेतनातील विभाग प्रमुख यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करुन नियुक्ती पुढे सुरु ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन आदेश क्र. पकास-३४२६/प्र.क्र.१७/२६/ई-१५४९४२५/तांशि-७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०८ मे, २०२६.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.परिवि-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दि.२२/०६/२०२१.
२) संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र.४अ/आस्था/परिविक्षा-श्री. हाके व श्री. कचवे/२०२६/२१३२५१३, दि.०४/०२/२०२६.
३) संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र.४अ/आस्था/परिविक्षा-श्री.कचवे/२०२६/१७०, दि.२४/०४/२०२६.

**शासन आदेश:-**

शासकीय तंत्रनिकेतनांमधील, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ, या संवर्गातील शासकीय तंत्रनिकेतन, धुळे येथील संबंधित विभाग प्रमुख यांची दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली आहे. सदरचा कालावधी पूर्ण झाल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.०२ व ०३ येथील पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

०२. शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासंदर्भातील संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयातील अटींची पूर्तता संबंधीतांचे प्रकरणी होत असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी खालील तक्त्यात स्तंभ क्र.०६ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून समाप्त करण्यात येत आहे व त्यांची सेवा स्तंभ क्र.७ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून नियमितपणे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अध्यापकाचे नाव व पदनाम | नियुक्ती आदेश दिनांक | रुजू झाल्याचा दिनांक | परिविक्षा कालावधीतील रजेचा कालावधी | परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याचा दिनांक | सेवा पुढे चालू ठेवण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री.शरद दगा कचवे, विभाग प्रमुख, उपयोजित यंत्रशास्त्र, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे | शा.नि. क्र.ससेनि-३२२२/प्र.क्र.१५९/२२/तांशि-७, दि.३१/०३/२०२३ | ०१/०४/२०२३ (म.पू.) | निरंक | ३१/०३/२०२५ (म.नं.) | ०१/०४/२०२५ (म.पू.) |

०३. संबंधित संस्था प्रमुखांनी उक्त विभाग प्रमुख यांच्या पुढील वेतनवाढी मुक्त करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही तातडीने करावी.

०४. सदर शासन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.परिवि-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दि.२२/०६/२०२१ मधील तरतुदीन्वये व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.परिवि/२७१५/

प्र.क्र.२०३/आठ, दि.२५ ऑगस्ट, २०१५ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांस प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५०८१५३२०५५००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHAKRADHAR ANKUSH RASKAR

Digitally signed by CHAKRADHAR ANKUSH RASKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Higher and Technical Education, 2.5.4.20=FEF3117E7DA42C7DECA719FADB0E6E7DB4EB23A7A5CFFDEF083256395D8CB960, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=974A2353BD531D0473538CAD51948CBC2B6E0FC66271028065996CA78A2B70EC, cn=CHAKRADHAR ANKUSH RASKAR
Date: 2026.05.08 15:33:25 +05'30'

**( चक्रधर रासकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रतः-** श्री. शरद दगा कचवे, विभाग प्रमुख, उपयोजित यंत्रशास्त्र, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत).

**प्रति,**

१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक,
३) प्राचार्य, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे,
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
५) जिल्हा कोषागार अधिकारी, धुळे,
६) निवडनस्ती/तांशि-७.